# प्रसिध्दीपत्रक

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

जा.क्र./पोउआ/वाह/ २५३८ /२०२५ — पुणे दिनांक -२८/०३/२०२५

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, विश्रांतवाडी वाहतुक विभागातील खालील नमुद ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी वाहतूकीचे असलेले निर्बंध रद्द करण्यात येत आहेत.

**विश्रांतवाडी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **कळस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सोसायटीच्या मुख्य गेटच्या उजव्या बाजूस ५० मीटर व डाव्या बाजूस ५० मीटर नो पार्कींग करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक –२८/०३/२०२५ ते दिनांक – १० /०४/२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

पोलीस उपआयुक्त वाहतुक विभाग, पुणे.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-

**२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – परि १**, पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम**, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**४) प्रभारी अधिकारी विश्रांतवाडी** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टसह दोन दिवसात सादर करावी.**

**५) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६) पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.